# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 19/03/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये, सी.एस.सी. केंद्रांमध्ये, महाऑनलाईन केंद्रांमध्ये, आधार नोंदणी केंद्रांमध्ये विविध प्रकारच्या शासकीय कामांसाठी होणारी नागरिकांची गर्दीमुळे व या केंद्रांमध्ये विविध प्रकारच्या शासकीय कामांसाठी नागरिकांच्या हातांच्या बोटांचे बायोमेट्रीक यंत्रणेवर ठसे घेतले जातात या बाबीमुळे करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव होण्याचा संभाव्य धोका लक्षात घेता उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्र, सी.एस.सी. केंद्र, महाऑनलाईन केंद्र, आधार नोंदणी केंद्र दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व सर्व आपले सरकार सेवा केंद्र, सी.एस.सी. केंद्र, महाऑनलाईन केंद्र, आधार नोंदणी केंद्र दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद ठेवणेबाबत आदेशित करीत आहे.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.



Scanned by CamScanner

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

-sd-

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.
4. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. उपविभागीय अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं., जि. प. उस्मानाबाद.
8. तहसिलदार सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
11. जिल्हा समन्वयक, महाऑनलाईन, उस्मानाबाद.
12. जिल्हा समन्वयक, आपले सरकार, जि. प. उस्मानाबाद.
13. जिल्हा समन्वयक, सी.एस.सी. 2.0 उस्मानाबाद.

19/3/20
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner